महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापू/विवि/संस्थाबदल २०२०/ २१३८ दिनांक :- 29 JUL 2020

**परिपत्रक :-**

संचालक/प्राचार्य,
खाजगी विनाअनुदानित,
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एच.एम.सी.टी,
पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, पुणे विभाग

विषयः शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम/पाळीबदल, तसेच पहिल्या, दुस-या व तिस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत...

संदर्भ : १) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५
२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र २/एनजीसी/वि.स.ब/५३६ दिनांक २७/०७/२०२०
३) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र २/एनजीसी/वि.स.ब/५३७ दिनांक २७/०७/२०२०

उपरोक्त विषयास अनुसरुन प्राप्त संदर्भ क्र ३ च्या परिपत्रकाची व सहपरिपत्रकाची छायाप्रत सोबत जोडलेली आहे. त्या अनुषगाने सर्व संस्थाना कळिवण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रकामध्ये दिलेल्या निदेर्शानुसार अंतर्गत शाखा बदलाची तसेच संस्था बदल/शाखा बदलासह संस्था बदल व विद्यापीठ बाहेरील संस्थाबदल या बाबतच्या प्रस्तावाची कार्यवाही करावी.

विद्यार्थी संस्था बदल/शाखा बदलाच्या अनुषंगाने खालील सूचनांचे सहसंचालक,तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालये/संबंधित संस्था/विद्यार्थी यांनी काटेकोर पालन करावे.

१. विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेल्या. स्टेटमेंट Annexure A च्या विहीत नमुन्यात संस्था बदलासाठीचा अर्ज संस्था बदलीने प्रवेश देणा-या संस्थेत सादर करावा. सदर अर्जासोबत सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ बदल असल्यास विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र, शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्याचे प्रमाणपत्र किंवा 100/- स्टॅम्प पेपरवर शिक्षणातील खंडाबाबत प्रतिज्ञापत्र, प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्ष प्रवेशाचे ॲलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास) गुणपत्रिका (सांक्षांकित) व संस्था बदल करण्यासाठीचे कारण या पृष्ठ्यर्थ पुरावे या दस्तावेजासह सादर करणे अनिवार्य राहील, अपुर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रविना सादर केलेले अर्ज या कार्यालयास प्राप्त झाल्यास याबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची सर्व संबधितांनी नोद घ्यावी

२. सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र व विद्यापीठ बदल असल्यास, विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी पुर्णपणे संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

३. विद्यमान संस्थेच्या संस्थाप्रमूखांनी (Present/Parent Institute) विद्यार्थ्यांना संस्था बदलास ना-हरकत प्रमाणपत्र देतांना त्यामध्ये Institute DTE Code, Students Application ID, Course Choice Code, GAP इ. माहिती नमूद करणे अनिवार्य राहील.

४. संस्था बदल व शाखा बदलासह संस्था बदल याकरीता विद्यार्थ्यांनी ज्या विनाअनुदानित संस्थेसाठी विनंती केलेली आहे त्या विनाअनुदानित संस्थेच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही उपरोक्त कालमर्यादेत होईल याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा करावा. तसेच यासाठी विद्यार्थी किंवा पालक यांना वरिष्ठ कार्यालयात व्यक्तीशः पाठविल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.

५. सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, बदली मागितलेल्या विद्यार्थ्यास या संचालनालयाचे मान्यता आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवू नये , तसेच संबधित विद्यार्थ्याच्या संस्था बदलीसाठी केवळ ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्यांचे संस्थेतील प्रवेश रद्द करु नये.

६. विद्यार्थी संस्था बदलास या संचालनालयाची /संचालनालयाने प्राधिकृत केल्यानुसार सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांची पुर्व मान्यता नसतांना संस्था बदलाने जाण्यास संस्थेने (Present/Parent Institute) लिव्हींग सर्टीफीकेट देणे व संस्था बदलाने प्रवेश देणा-या संस्थेने (Aspiring Institute) प्रवेश दिल्यास त्यास संचालनालयामार्फत मान्यता देण्यात येणार नाही, या संचालनालयाची व संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या प्राधिका-यांची पुर्व मान्यता नसतांना संस्था बदलीने प्रवेश दिल्याचे आढळून आल्यास विद्यार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था व संस्था बदलाने प्रवेश देणारी संस्था या दोन्ही संस्थाच्या संस्था प्रमूखांना जबाबदार धरुन त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

७. द्वितीय वर्ष अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र मधील विद्यार्थी संस्था बदलाची कार्यवाही थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठीच्या रिक्त जागा प्रसिध्द होण्याच्या दिनांकाच्या ५ दिवसापुर्वीच्या दिनांकापर्यत व या व्यतिरीक्त इतर विद्यार्थी संस्था बदलाच्या अर्जावर दि १४.०८.२०२० पर्यंत करण्यात येईल . सदर कालमर्यादेतनंतर प्राप्त झालेल्या संस्था बदलासाठीचे अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता दप्तरी दाखल करण्यात येतील याची सर्व संबंधितांनी नोंद धेण्यात यावी . या कालमर्यादेपुर्वी विद्यापीठाचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर, संबधित विद्यार्थी शाखा बदल, संस्था बदल, संस्थाबदलासह शाखा बदल, संस्था शाखा बदलास विद्यापीठ बदल इत्यादी मागणीचा विचार करण्यात येणार नाही.

८. **कोविड-१९ या साथरोगाची परिस्थिती विचारात घेता या कार्यालयात विद्यार्थी व पालकांना व्यक्तीश पाठविण्यात येऊ नये तसेच संस्थेच्या प्रेतनिधीनी या कार्यालयात येण्यापूर्वी दूरध्वनीवरुन पूर्वपरवानगी घेवूनच उपस्थित रहावे या बाबीची विशेष नोंद घ्यावी**

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

सोबत :

१. संदर्भ क्र ३ चे पत्र
२. अर्जाचा नमुना Annexure A
३. Annexure B

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३, ४५०
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२०/५३६ दिनांक : 27 JUL 2020

परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३(भाग-३)/तांशि ४, दि. २४.०४.२०१७

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्यास संदर्भीन अधिसूचनेतील नियम क्र. १६ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे. सदर नियमाची प्रत (मराठी व इंग्रजी मधील) सोबत माहितीसाठी जोडली असून त्यामध्ये पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठीची प्रमुख पात्रता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | विनंती | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | दुसरे वर्ष | अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रम / पाळी / संस्था बदल | प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम / पाळी / संस्था बदलीस विंनती केलेल्या शाखेत सबंधित संस्थेत रिक्त जागांची उपलब्धता, तसेच विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता. |
| २ | तिसरे वर्ष | संस्था बदल | प्रथम वर्ष उत्तीर्ण, द्वितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये तृतीय व चतुर्थ सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, संस्था बदलीस विंनती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता व विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता |
| ३ | चौथे वर्ष | संस्था बदल | प्रथम व द्वितीय वर्ष उत्तीर्ण, तृतीय वर्षाच्या परीक्षेमध्ये पाचवे व सहावे सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम / पाळी / संस्था बदलीस विंनती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता व विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता |

२. पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठी नियमानुसार पात्र इच्छुक विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज (अर्जाचा नमुना Annexure A ज्या शैक्षणिक संस्थेत पाठ्यक्रम बदल / संस्था बदल पाहिजे अशा शैक्षणिक संस्थेकडे खालील कागदपत्रांसह दि. १७ ऑगस्ट, २०२० पर्यंत सादर करावा. सदर दिनांकानंतर तसेच अपुर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेले अर्जांबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

circular 21515
28/7/2020

क) संस्था बदलासाठीचा अर्ज (सोबत जोडलेल्या नमुन्यात)

ख) सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र

ग) बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र

घ) ज्या वर्षासाठी (दुसरे, तिसरे, चौथे) संस्था बदलासाठी विनंती केली आहे, त्या वर्षापूर्वीच्या सर्व वर्गांच्या गुणपत्रिका

ङ) संस्था बदलामुळे विद्यापीठ बदल असल्यास विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र.

च) शिक्षणात खंड असल्यास ज्या शैक्षणिक संस्थेतील शैक्षणिक खंड आहे त्या संस्थेच्या प्राचार्यांनी दिलेले खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) किंवा रु.१००/-च्या स्टँप पेपरवर शिक्षणातील खंडाबाबत प्रतिज्ञापत्र.

छ) प्रथम वर्ष किंवा थेट व्दितीय वर्ष प्रवेशाचे ॲलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास).

ज) संस्था बदल करण्यासाठीचे कारण या पृष्ठर्थ पुरावे

३. संस्था बदलाकरीताच्या अर्जासोबत परिच्छेद क्रमांक २ (क ते ज) नमूद केलेले कागदपत्रासह परिपूर्ण अर्जाचा विचार करण्यात येईल. अपूर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेले अर्जाबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोद घ्यावी.

४. विद्यार्थ्यांनी सध्या शिक्षण घेत असलेल्या शैक्षणिक संस्थेकडून फक्त ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे, लिव्हींग सर्टीफीकेट घेऊ नये, संस्था बदलाचे आदेश पारित झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट घेण्यात यावे.

५. प्रथम / व्दितीय वर्षात एकदा प्रवेश घेतलेला विद्यार्थी त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलून मागण्यास पात्र असणार नाही.

६. विना-अनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत शासकीय, शासन अनुदानित, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित शैक्षणिक संस्थेमध्ये संस्था बदल अनुज्ञेय नाही, तथापी शासकीय, शासन अनुदानित, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांना विना-अनुदानित शैक्षणिक संस्थेत संस्था बदल अनुज्ञेय आहे.

७. विद्यार्थ्यांना, कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थांमध्ये बदलून जाता येणार नाही.

८. अधिसंख्य कोटयातील जागे अंतर्गत प्रवेशित विद्यार्थी (Admitted under Supernumerary Quota seats) पाठ्यक्रम किंवा संस्था बदलासाठी पात्र नाहीत.

९. संस्था बदलासाठीच्या प्रक्रियेपूर्वी विद्यापीठाचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर, संबंधित विद्यार्थ्यांचा शाखा बदल, संस्था बदल इ. मागणीचा विचार करण्यात येणार नाही.

१०. संस्था बदल ज्या संस्थेत पाहिजे आहे त्याच संस्थेकडे विद्यार्थ्यांनी परिपूर्ण अर्ज जमा करावयाचा असून या कार्यालयाकडे किंवा सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे विद्यार्थ्यांनी थेट अर्ज करू नये. या कार्यालयाकडे किंवा सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे प्राप्त होणा-या थेट अर्जावर कोणतीही कार्यवाही होणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

११. संस्था बदलासाठीचा अर्ज जमा केल्यानंतर सदर अर्जावरील पुढील कार्यवाही तथा पाठपुरावा संबंधित संस्थेकडून करण्यात येणार असल्याने विद्यार्थी व पालकांनी या कार्यालयास किंवा सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे व्यक्तीश: भेट देऊ नये.

१२. विद्यार्थ्यांनी संस्था बदलासाठीच्या विनंती अर्जात त्यांचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक नमूद करावा, जेणेकरून त्यांचे अर्जाच्या अनुषंगाने अधिकची माहिती आवश्यक असल्यास ती तात्काळ उपलब्ध करून घेणे शक्य होईल. तसेच त्यांची विनंती मान्य झाल्यास मान्यतेचे आदेश त्यांना ई-मेल द्वारे पाठविणे शक्य होईल.

१३. पाठ्यक्रम, संस्था व विद्यापीठ स्थलांतरण विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार केल्यामुळे होणा-या कोणत्याही शैक्षणिक परिणामास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

१४. सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेकडून मुळ प्रमाणपत्र घेण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी तथा त्याच्या पालकाची राहील.

१५. संस्था स्थलांतरणामुळे पूर्वीच्या संस्थेतील फी परतावा किंवा अदा करावयाची असल्यास तसेच स्थलांतरणाच्या संस्थेत फी अदा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी तथा त्याच्या पालकाची राहील.

१६. एमबीए, एमसीए, पीजीडीएम, एमई/एमटेक, एम.फार्म, एम.आर्च,एम.एचएमसीटी इ. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास नियमानुसार संस्था बदल अनुज्ञेय नाही. यास्तव सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी संस्था बदलासाठी अर्ज करू नये.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण,म. रा. मुंबई

प्रत : मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाना अग्रेषित करून संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यास कळविण्यात यावे.

२. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करून पुढील उचित कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.

३. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)

४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई

५. कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

ANNEXURE - A

## APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER I, II OR III YEAR

1. Name of the Student (In Full) :
2. Application ID :
3. Academic year of Admission in the present Institute :
4. Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) :
5. Address for correspondence with Pin code & Telephone Nos. ( if any) :
6. Name of Parent Institute / Present Institute with DTE Code : DTE CODE ____________ Name ____________
7. Course of Study Details : Year / Semester ________ Branch _____ Choice Code ____________
8. Details of the Result of last exam.

| Branch / Faculty | Year / Semester | Year of Passing | Summer / Winter | No. of attempt | Percentage | University |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7 |
| | | | | | | |

9. Details of backlog subjects (if any) :
10. Name and DTE code of aspiring institute where admission by transfer is sought : DTE CODE ____________ Name ____________
11. Branch & Year / Semester and university in which admission by transfer is sought : Branch / Course ____________ Year / Semester ____________ Choice Code ____________ University ____________
12. Reasons for change of Institute/ change of branch and University : ____________

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit.

**Date : / /2020** **Signature of Student**

Name and DTE code of the Parent Institute / Present Institute: ____________

No ---------------------- Date :- / /2020

**No Objection Certificate**

Certified that information furnished by applicant (Name) ------------------------------ is verified form the record. His / Her admission was not under supernumerary quota / TFWS category.. This institute has no objection for his / her transfer from this college / institute.

Seal of College / Institute Signature of Principal

Name and DTE code of the Aspiring Institute: ____________

No ---------------------- Date :- / /2020

**No Objection Certificate**

This institute has no objection & agrees to admit the above candidate Shri / Kum. ____________ to the branch ________ to Year / Semester ________ during the current academic year ________. After admitting all the internal students and ex-students and exhausting the claims of change of branch of internal candidates, the vacancies in year and course ________ are ________ ( Nos.) I have ascertained the eligibility of the candidate for the above mentioned admission.

Seal of College / Institute **Signature of the Principal**

**Note: Institute's NOC can be issued on the letter head of the College / Institute separately if desired so by Director / Principal.**

RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ३, अंक ४४(५)] सोमवार एप्रिल २४, २०१७/वैशाख ४, शके १९३९ [पृष्ठे ३६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १०४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल २०१७

### अधिसूचना

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक टीईएम. २०१६/सीआर ४७३ (भाग -३)/टीई-४.—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम २८) च्या कलम २३ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासन अधिसूचना उच्च व तंत्रशिक्षण, क्रमांक टीईएम. २०१५/सीआर ५३६/टीई. ४, दिनांक ११ मार्च २०१६ अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन याव्दारे पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षांना (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान) द्यावयाचे प्रवेश विनियमित करण्यासाठी पुढील नियम करीत आहे:—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—

(१) या नियमांना, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन), नियम, २०१७ असे म्हणावे.

(२) ते दिनांक २४ एप्रिल २०१७ पासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**— (१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. २८), असा आहे ;

(ख) " प्रवेश उपस्थिती केंद्र " याचा अर्थ, जेथे उमेदवार प्रवेशाबाबतची कागदपत्रे सादर करून आणि शुल्काचा भरणा करून प्रवेश निश्चित करण्यासाठी उपस्थित राहील असे केंद्र, असा आहे ;

(ड) कोणतीही संस्था, ज्यांच्याकडे उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे, पदविका/पदवी, व इतर कागदपत्रे त्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी जमा केलेली असतील, व जर उमेदवार अशा संस्थेमध्ये अभ्यासक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसतील अशा प्रसंगी जमा करण्यात आलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी, व इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाहीत किंवा त्यासाठी अशा अभ्यासक्रमाचे किंवा इतर कोणतेही शुल्क अदा करण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकणार नाहीत.

**१६. पहिल्या, दुस-या किंवा तिस-या वर्षानंतर पाठयक्रम किंवा संस्था बदलणे,—**

(१) प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर म्हणजेच प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण असलेले किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेले, पाठ्यक्रम किंवा पाळी बदलण्याची विनंती करणा-या उमेदवाराला, जागांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून त्याच संस्थेत तसे बदल करण्याची मुभा देण्यात येईल आणि हे बदल प्रथम वर्षाच्या/प्रथम व द्वितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे करण्यात येतील. उमेदवार जो पाठ्यक्रम बदलून घेणार आहे त्या पाठ्यक्रमासाठी संबंधित विद्यापीठाने निर्धारित केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती करण्याची जबाबदारीसंबंधित संस्थेच्या प्राचार्यांची असेल.

(२) उमेदवारांचा एक/दोन/तीन वर्षानंतर पाठयक्रम आणि/किंवा संस्था बदल खालील प्रमाणे करण्यात येतील,—

(क) प्रथम/द्वितीय वर्षात एकदा प्रवेश घेतलेला उमेदवार त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलून मागण्यास पात्र असणार नाही ;

(ख) प्रथम वर्षाच्या परीक्षेमध्ये (प्रथम व द्वितीय या दोन्ही सत्रांच्या)/द्वितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये (तृतीय व चतुर्थ सत्राच्या)/ तृतीय वर्षाच्या (पाचव्या व सहाव्या सत्राच्या) सर्व विषयामध्ये उत्तीर्ण असणारा किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या विषयांपैकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेला उमेदवार तसेच द्वितीय वर्षातील बदलासाठी प्रथम वर्षात उत्तीर्ण व तृतीय वर्षातील बदलासाठी प्रथम व द्वितीय वर्षात उत्तीर्ण उमेदवारास संस्था किंवा पाठ्यक्रम बदलून घेण्यास पात्र असेल ;

(ग) विना-अनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, किंवा विद्यापीठ संचालित संस्था, कोणत्याही टप्प्यावर बदलून घेता येणार नाही. तथापि शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, किंवा विद्यापीठ संचालित संस्थेतील उमेदवाराला विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये बदल करून देण्याची मागणी करता येईल ;

(घ) विद्यार्थ्यांना, कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थांमध्ये बदलून जाता येणार नाही ;

(ड) विनाअनुदानित संस्थांमध्ये बदलून जाणे :- विनाअनुदानित संस्थांचे प्राचार्य हे, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पूर्व मान्यतेने, संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठाचे विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र व रिक्त जागांबाबतची स्थिती सादर केल्यावर, बदल करुन घेण्याच्या मागणीसाठी इतर संस्थामधील उमेदवारांचा विचार करतील. उमेदवार जो पाठ्यक्रम बदलून घेत आहे, त्या पाठ्यक्रमासाठी संबंधित विद्यापीठाने निर्धारित केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती संस्थेचे प्राचार्य किंवा संचालक करतील;

(च) संस्थेच्या प्राचार्यांच्या शिफारशी शिवाय तंत्र शिक्षण संचालनालयाकडून कोणताही अर्ज दाखल करुन घेतला जाणार नाही ;

(छ) जर बदल करून घेण्याच्या प्रक्रियेपूर्वी विद्यापीठाचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर, त्या विद्यापीठाचे/ संस्थेचे उमेदवार बदल करून घेण्याबाबतच्या मागणीपासून वंचित राहतील.

(३) अधिसंख्य कोट्यातील जागे अंतर्गत प्रवेश देण्यात आलेले उमेदवार हे पाठ्यक्रम किंवा संस्था बदलण्यासाठी पात्र असणार नाहीत.

(४) या अधिसूचनेच्या अंतर्गत समाविष्ट नसलेल्या व्यावसायिक शैक्षणिक शिक्षण संस्थामधील उमेदवार, या अधिसूचने अंतर्गत समाविष्ट विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थेमध्ये संस्था व अभ्यासक्रम बदलासाठी, अधिसूचनेच्या कलम ३(१) मधील पात्रतेच्या अटी, शर्ती व निकष आणि वरील (२) मधील नियमांच्या पूर्ततेच्या अधीन राहून पात्र असतील.

(५) वरील प्रमाणे केलेले सर्व शाखा बदल व संस्था बदल तंत्र शिक्षण संचालनालय, प्रवेश नियामक प्राधिकरणास कळवील.

(b) After receiving duly signed admission cancellation request letter from the Candidate as per schedule published by the Competent Authority, the institution shall cancel the admission immediately and generate online acknowledgement of cancellation of admission through institution login and issue a signed copy to the Candidate.

(c) The refund of fees on or before cut-off date of the admissions declared by the Competent Authority, shall be made within two days i.e. total fee minus the processing charges of Rs.1,000 or refund rule shall be as per the guidelines of the appropriate authorities or the State Government, as the case may be.

(d) If the admission is cancelled after the cut-off date of the admission declared by the Competent Authority, there shall be no refund except the Security Deposit and Caution Money Deposit.

(e) No institution, who has in its possession or custody, of any document in the form of certificates of degree, diploma or any other award or other document deposited with it by a person for the purpose of seeking admission in such institution, shall refuse to return such degree, certificate award or other document with a view to induce or compel such person to pay any fee or fees in respect of any course or program of study which such person does not intend to pursue or avail any facility in such institution.

16. *Change of Course or Institution after First, Second or Third year.*— (1) The Candidate seeking for a change in course or shift after successfully completing the First Year of studies or both first and second semester examination in full or failed in one of the heads of passing will be allowed to do so in the same institution subject to the availability of seats and changes will be carried out based on the marks of First Year or First and Second Semester together. The Principal shall be responsible for ascertaining the eligibility of the Candidates as laid down by the concerned University for the course to which the Candidate is being transferred ;

(2) Transfer of Candidates (Course and/or Institution) after one/two/three year shall be made in the following manner : —

(a) The Candidate once admitted in first or second year shall not be eligible for transfer to any other institution during the same academic year;

(b) The Candidate passing the first year (both first and second semester) or second year (both third and fourth semester) or third year (both fifth and sixth semester) examinations in full or failed in one of the heads of passing are considered as eligible for transfer of Institution or course, provided that for transfer after second year the candidate should have passed the first year, and for transfer after third year the candidate should have passed first and second year;

(c) There shall be no transfer of students at any stage in any case from Unaided Institutions to Government or Government Aided,University Departments, University Managed Institutions. However, the Candidate from Government or Government Aided, University Departments, University Managed Institution may seek transfer to Unaided Educational Institution;

(d) There shall be no transfer of students at any stage to Autonomous Institutions;

(e) *Transfer to Unaided Institutions.*— The Principals of Unaided institutions shall consider the Candidates from other institutions for transfer with prior approval from the Directorate of Technical Education on submission of No Objection Certificate (NOC) from institution, Eligibility Certificate from University and Vacancy position. The Principal or Director shall ascertain the eligibility of Candidates as laid down by the concerned University for the course to which the Candidate is being transferred ;

(f) No application without recommendation of the Principal of Institution shall be entertained by the Directorate of Technical Education ;

(g) If the result of the University or Institution is not declared before the process of transfer, Candidates of that University or institution will lose claim on transfer ;

(3) The Candidates admitted under Supernumerary Quota seats are not eligible for change of Course or Institution;

(4) The candidates from the professional educational institutions which are outside the purview of the act shall be eligible for transfer to the unaided private professional educational institutions subject to the fulfilment of eligibility criterion and requirements stipulated under the provisions of sub section (*1*) of section 3 of the Act and the fulfilment of the conditions stated in sub-rule (2).

(5) List of all such transfers shall be communicated by the Directorate of Technical Education to the office of the Admissions Regulating Authority for final approval.

*Schedule–I*

(For First Year Admission)

(*See* rule 6 and 7)

A. Allocation of seats within Sanctioned Intake

| Sr. No. | Type of Institution | No. of Seats- as % of Sanctioned Intake | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | CAP Seats | | | Institutional |
| | | Maharashtra State State (M.S.) Candidates | Minority Quota | All India Seats | Quota (including 5% Quota for NRI, if applicable) |
| 1 | Unaided Private Professional Educational Institutions (excluding minority institutions) | Autonomous - 65% (State Level) Non- Autonomous- 45.5 % for HU, 19.5 % for OHU | Nil | 15% | 20% |
| 2 | Unaided Minority Educational Institutions | Autonomous* 100% of M.S. Seats$ (State Level) Non- Autonomous*- 70 % of M.S. Seats$ for HU, 30 % of M.S. Seats$ OHU | Minimum 51%@ | 15% of Seats under CAP # | 20% |

CAP Seats = Sanctioned Intake – Institutional Quota

# CAP seats excluding Minority Quota

$ M.S. Seats = CAP Seats – (All India Seats + Minority Quota)

%- Percentage

* The seats excluding the Minority Quota and the Institutional Quota shall be filled in the stipulated percentage from the Maharashtra Candidature Candidate and All India Candidature Candidate.

@These are the minimum percentage of seats to be filled in the Minority Institution through CAP, this may be extended up to 100%. However, before commencement of the CAP, such Institution shall declare and inform to the Competent Authority, the maximum percentage of minority quota to be filled in their institution.The Institutional quota for Architecture and Pharmacy includes 5% quota for NRI and in case the seats remain unfilled then they shall be allotted to the candidates with All India Candidature.

**B. Allocation of Supernumerary Seats**

(1) Jammu and Kashmir Migrant Candidates seats to be filled by the Competent Authority- The number of seats for this quota shall be as per the policy of the Government.

११

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३, ४५०
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२०/५३७ दिनांक : 27 JUL 2020

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

२) प्राचार्य,सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,
वास्तुशास्त्र,एचएमसीटी इ. पदवी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

पहा : १) शासन अधिसूचिना क्रमांक संकीर्ण २०१९/प्र.क्र. ३६८/तांशि ४, दि. ०९ जुलै, २०२०
२) शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१९/प्र.क्र. ३९/तांशि ४, दि. ०४ जून, २०१९
३) शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१८/सी.आर.२६/टीई-४, दि. ०५ जून, २०१८
४) शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३(भाग-३)/तांशि ४, दि. २४. जुलै, २०१७
५) अभातंशिप,नवी दिल्ली यांचे पत्र.क्र.एआयसीटीई/एबी/ॲकॅडेमिक कॅलेंडर/२०२०-२१, दि. ०७ जुलै, २०२०
६) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२०/५३६, दि.२७ जुलै, २०२०

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्रमाक ५ नुसार सुचित केल्यानुसार विद्यमान विद्यार्थ्यांसाठी शै.व. २०२०-२१ चे शैक्षणिक सत्र दि. १७.०८.२०२० पासून सुरू करावयाचे आहे. यास्तव शै. व. २०२०-२१ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील ईच्छुक विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्यासाठीचे अर्ज ज्या शैक्षणिक संस्थेत पाठ्यक्रम बदल /संस्था बदल पाहिजे आहे अशा संस्थेत दि.१७.०८.२०२० पर्यंत करण्यासाठी संदर्भ क्रमांक ५ च्या परिपत्रकान्वये सुचित करण्यात आलेले आहे. यास्तव विद्यार्थी पाठ्यक्रम / संस्था बदलासाठी प्राप्त होणा-या अर्जांवर दि. २४.०७.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार सोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार तीन स्तरावर मान्यता देण्याची कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी. सदर कार्यवाही करतांना सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी नियमांचे काटेकोर पालन करावे.

circular
28/7/2020

१. या संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक ५ च्या परिपत्रकानुसार प्राप्त होणा-या अर्ज व त्यासोबतच्या कागदपत्रांची तपासणी प्राचार्य / सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे स्तरावरुन नियमातील तरतूदीनुसार करुन सोबतच्या प्रपत्रात नमुद केल्यानुसार कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी.

२. विद्यमान संस्थेच्या संस्थाप्रमुखांनी (Present / Parent Institute) विद्यार्थ्यांना संस्था बदलास ना-हरकत प्रमाणपत्र देतांना त्यामध्ये Institute DTE Code, Students Application ID, Course Choice Code, Vacancy of concern branch, GAP इ. माहिती नमूद करणे अनिवार्य राहील.

३. पाठ्यक्रम, संस्था व विद्यापीठ स्थलांतरणास संबंधित संस्थेने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्र व रिक्त जागा विचारात घेऊन मान्यतेची कार्यवाही होणार आहे. याबाबत भविष्यात रिक्त जागा नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्यार्थ्याचे स्थलांतरण पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल परिणामस्वरुप विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्थेच्या प्राचार्यांवर व्यक्तीश: जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

४. संस्था बदल व शाखा बदलासह संस्था बदल याकरीता विद्यार्थ्यांनी ज्या विनाअनुदानित संस्थेसाठी विनंती केलेली आहे त्या विनाअनुदानित संस्थेच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सोबतच्या प्रपत्रात नमूद कालमर्यादेत होईल याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा वरिष्ठ कार्यालयांकडे त्यांचे स्तरावरुन करावा. कोविड-१९ या साथरोगाची परिस्थिती विचारात घेता, वरिष्ठ कार्यालयात विद्यार्थी व पालकांना व्यक्तीश: पाठविण्यात येऊ नये या बाबीची विशेष नोंद घ्यावी. तसेच पाठ्यक्रम / संस्था बदलाचे आदेश पारित झाल्यास ते विद्यार्थ्यांना ई-मेल द्वारे संस्था स्तरावरुन पाठविण्यात यावेत.

५. दि. २४.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील पाठ्यक्रम, संस्था बदलाच्या तरतुदी / नियम स्पष्ट असून याबाबतची कार्यवाही करतांना नियम तथा तरतुदींचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्राधिका-यास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६. विद्यार्थी संस्था बदलाच्या नियमामध्ये अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून नियम शिथील करण्याचे प्राधिकार नमूद नाहीत, त्यामुळे नियमानुसार संस्था बदल अनुज्ञेय नसलेल्या विद्यार्थ्यांची प्रकरणे संस्था व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे स्तरावरुन तात्काळ निकाली काढण्यात यावीत व तसे संबंधितांना कळविण्याची कार्यवाही करावी.

७. सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, बदली मागितलेल्या विद्यार्थ्यांस या संचालनालयाचे मान्यता आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवू नये. तसेच संबंधित विद्यार्थ्याच्या संस्था बदलासाठी केवल ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्यांचे संस्थेतील प्रवेश रद्द करु नये अथवा सदर रिक्त होणा-या जागेवर संचालनालयाची मान्यता प्राप्त होण्यापुर्वी इतर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये.

८. विद्यार्थी संस्था बदलास या संचालनालयाची / संचालनालयाने प्राधिकृत केल्यानुसार सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांची पूर्व मान्यता नसेल तर असा संस्था बदल अनधिकृत समजण्यात येईल. संचालनालयाच्या/विभागीय कार्यालयाच्या पूर्वमान्यतेशिवाय संस्था बदलाने जाण्यास संस्थेने (Present / Parent Institute) लिव्हींग सर्टीफीकेट देणे व संस्था बदलाने प्रवेश देणा-या संस्थेने (Aspiring Institute ) त्या लिव्हिंग सार्टिफिकेटआधारे विद्यार्थ्यास प्रवेश दिल्यास त्यास संचालनालयामार्फत कार्योत्तर मान्यता देण्यात येणार नाही याची विशेष नोंद घ्यावी. या संचालनालयाची किंवा संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या प्राधिका-याची पुर्व मान्यता नसतांना संस्था बदलीने प्रवेश दिल्याचे आढळून आल्यास विद्यार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था व संस्था बदलाने प्रवेश देणारी संस्था या दोन्ही संस्थांच्या संस्था प्रमुखांना जबाबदार धरुन त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

९. विद्यार्थी संस्था बदलाबाबत सोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी. सदर कालमर्यादेपुर्वी विद्यापीठाचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर, संबंधित विद्यार्थी शाखा बदल,

संस्था बदल, संस्थाबदलासह शाखा बदल, संस्था शाखा बदलास विद्यापीठ बदल इ. मागणीचा विचार करण्यात येणार नसल्याची माहिती नियमातील तरतुदीच्या आधारे संस्था स्तरावरुन विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

१०. कोविड १९ या साथरोगाची परिस्थिती विचारात घेता संस्थाबदलाबाबतचे प्रस्तावांची माहिती सोबतच्या Annexure B सह प्रस्ताव ई-मेल द्वारे सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय व या संचालनालयास मुळ कागदपत्राची पडताळणी केल्याच्या प्रमाणपत्रासह पाठविण्यात यावेत. विद्यार्थ्यांचा Annexure A मधील विनंती अर्ज व त्यासोबतची कागदपत्रांची विद्यार्थीनिहाय स्वतंत्र ई-फाईल (PDF) ईमेल द्वारे सादर करावी. तसेच प्रस्तावाची प्रत (हार्ड कॉपी) संबधित क्षेत्रातील टाळेबंदी संपल्यानंतर सादर करण्यात यावी. तसेच "Annexure B" ची Microsoft Excel sheet मधील Soft Copy संस्थेने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयास व तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयांनी या संचालनालयास ई-मेल द्वारे प्रस्तावासोबत पाठवावी.

११. अभ्यासक्रम / संस्था टप्प्याटप्प्याने बंद करतांना संस्थेत शिक्षण घेत असलेले सर्व विद्यार्थ्यांची पदवी पुर्ण होईपर्यंत सर्व शैक्षणिक व इतर सोई सुविधा पुरविण्याची जबाबदारी संस्थेची असून तसे हमीपत्र संस्थेने अभ्यासक्रम बंद / संस्था बंद करतांना दिलेले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी संस्था बदलाच्या नियमामध्ये अभ्यासक्रम / संस्था टप्प्याटप्प्याने बंद झाल्यामुळे संस्था बदलास अपात्र विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून नियम शिथील करण्याची तरतूद नाही. यास्तव टप्प्याटप्प्याने अभ्यासक्रम बंद / संस्था बंद या कारणामुळे संस्था बदलास अपात्र विद्यार्थ्यांच्या संस्था बदलाचे प्रस्ताव पाठविण्यात येऊ नये.

१२. कोविड-१९ या साथरोगामुळे असलेल्या टाळेबंदीच्या कारणास्तव काही विद्यार्थ्यांकडून थेट सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयास अर्ज सादर होण्याची शक्यता असल्याने अशा अर्जांवर सुध्दा कार्यवाही करावी. प्रस्ताव संस्थेऐवजी थेट विभागीय कार्यालयात सादर झाले म्हणून कार्यवाही करण्याचे टाळू नयेत.

१३. दि. २४.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ (४) अन्वये अधिसूचनेच्या अंतर्गत समाविष्ट नसलेल्या व्यावसायिक शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थी विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थेमध्ये संस्था व अभ्यासक्रम बदलासाठी, अधिसुचनेच्या कलम ३(१) मधील पात्रतेच्या अटी, शर्ती व निकष व नियम १६ (२) मधील नियमाच्या पुर्ततेच्या अधिन पात्र आहेत. सबब अशी प्रकरणे संबंधित विद्यार्थ्याची प्रथम, थेट द्वितीय वर्षात प्रवेशाच्या वेळी राज्यातील पात्रतेच्या अटी, शर्ती व निकषांच्या पृष्ठर्थ आवश्यक कागदपत्रांसह सादर करण्यात यावीत.

१४. सर्व अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र,वास्तुशास्त्र,एचएमसीटी पदवी संस्थेतील प्राचार्यांनी संस्था बदलाबाबतची सुचना संस्थेच्या संकेतस्थळी व नोटीस बोर्डवर लावण्यात यावी. तसेच शक्य असल्यास विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास ई-सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

१५. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे स्तरावरुन संस्था बदलास दिलेली मान्यता व संस्था स्तरावरुन संस्थेअंतर्गत शाखा बदलास दिलेली मान्यता याची माहिती मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना व या संचालनालयास सादर करावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, माहितीसाठी सादर

1) मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर
2) मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
3) कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
4) कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

प्रपत्र अ

| अ.क्र. | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संस्था अंतर्गत शाखा बदल /पाळी बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनेसार शाखा बदलाची कार्यवाही करावी | दि.१७/०८/२०२० किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संबंधित संस्थेचे प्राचार्य |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह Email द्वारे पाठविण्यात यावेत. | दि.१८/०८/२०२० किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या ३ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संस्था बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे प्राचार्य |
| २ | अ) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठांतर्गत) | विना अनुदानित संस्थाकडून संस्था बदलाबाबत विद्यापीठा अंतर्गत प्राप्त अर्जाच्या (१—ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणा-या संस्था बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी | दि.२५/०८/२०२० किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठ बदल) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या विद्यापीठाबाहेरील प्रस्तावांची दि. २४.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालयास ईमेल द्वारे पाठविण्यात यावेत. | दि.२०/०८/२०२० किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या ३ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| ३ | संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठ बदल) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे २-ब नुसार प्राप्त होणा-या अर्जावर तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल. | दि.२६/०८/२०२० किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संचालक, तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई |

Annexure B

Statement showing the list of candidates applied for change of Institute / Branch for Second / Third / Final year for A.Y. 2020-21

| Sr. No. | Name of the Student | Application ID | A.Y. of Admission in the current Institute | Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) | Parent / Current Institute detail | | | | | | | | | Admiting / Transfer Institute | | | | | | Reason for Transfer of students (if brief) | Remarks of Principal / Joint Director |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | DTE Code | Name of Institute | Year and Course name (e.g. 1st / 2nd / 3rd year -------- Engg /tech.) | Choice Code Of course | Admission Year of column no. 8 | Name of University | Result [Passed / failed in one head] | % of Marks | DTE Code | Name of Institute | Year and Course name (e.g. 2nd /3 rd/ 4th year ------ - Engg /tech.) | Choice Code Of course | Vacancy | Name of University | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

Seal of College / Institute / Office

Date :

Place :

Signature

(Name and Designation )

Name of Instittes / Office



15